# कोळशेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३८ /२०२४ दि. १२/११/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी**, कल्याण – डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणुक–२०२४ चे अनुषंगाने १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील **शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. राजेश गोवर्धन मोरे यांचे प्रचारार्थ दिनांक १३/११/२०२४ रोजी सायंकाळी १८:०० ते २२:०० वा. पावेतो समर्थ नगर, नांदिवली, डोंबिवली पुर्व** येथे सभा असल्याने सदर सभेकरीता महायुतीतील पक्षांचे कार्यकर्ते गोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) नांदीवली चौक, डोंबिवली पूर्व येथून स्वामी समर्थ मठाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **नांदीवली चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने नांदीवली रोडने, सलमान कॅटरर्स दुकाना समोरून विद्यासागर इंग्लिश स्कुल, बालाजी गार्डन सोसायटी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) स्वामी समर्थ मठाकडून नांदीवली चौक, नांदीवली रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **स्वामी समर्थ मठाजवळ "प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने नानू पार्क बिल्डींग समोरून बालाजी गार्डन सोसायटी, विद्यासागर इंग्लिश मार्गे नांदीवली रोडने इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना **दिनांक १३/११/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. पासुन ते रात्री २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

Scanned with OKEN Scanner

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/–सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

Scanned with OKEN Scanner
CamScanner